RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक २] गुरुवार, जानेवारी २२, २०२६/माघ २, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जानेवारी, २०२६.

**अधिसूचना**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक एमसीओ-२०२६/प्र.क्र.२७/नवि-१४.—मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८चा ३) च्या कलम २९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांन्वये आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी सल्लामसलत करून, मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम, २००७ मध्ये सुधारणा करून, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणण्यात येईल.

२. मुंबई महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) (सुधारणा) नियम, २००७ (यापुढे मूळ नियम असे संबोधण्यात येईल) मधील नियम ५ ऐवजी, पुढील नियम समाविष्ट करण्यात येत आहे :—

"५. **पीठासीन अधिकारी :**—महापौर अथवा उप महापौर यांच्या निवडीसाठी बोलविलेल्या विशेष बैठकीचे पीठासीन अधिकारी हे राज्य शासनाने आदेशाद्वारे नियुक्त केलेल्या, शासनाच्या प्रधान सचिव दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी असेल.".

३. मूळ नियमाच्या नियम ८ मधील “मात्र, नव्याने निवडून आलेले महापौर हे उप महापौर पदाच्या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी असतील” हे शब्द वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिरुध्द जेवळीकर,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated 22nd January, 2026.

*NOTIFICATION*

MUMBAI MUNICIPAL CORPORATIONS ACT.

No. MCO-2025/C.R.27/UD-14.—In exercise of the powers conferred by section 29 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1888) and of all other powers enabling it in that behalf the Government of Maharashtra hereby, after consultation with the State Election Commissioner, makes the following rules further to amend the Mumbai Municipal Corporation (Conduct of Election to the office of Mayor and Deputy Mayor) Rules, 2007, as follows, namely :—

1. These rules may be called the Mumbai Municipal Corporation (Conduct of Election to the office of Mayor and Deputy Mayor) (Amendment) Rules, 2026.

2. For rule 5 of the Mumbai Municipal Corporation (Conduct of Election to the office of Mayor and Deputy Mayor) Rules, 2007 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following Rules shall be substituted, namely :—

"**5.** *Presiding Authority* :—The special meeting to elect the Mayor or the Deputy Mayor shall be presided over by an officer not below the rank of Principal Secretary to Government, appointed by the State Government by an Order.".

3. In rule 8 of the principal Rules, the word "excepting that the newly elected Mayor shall be preceding authority for the election to the post of Deputy Mayor" shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIRUDDHA JEWLIKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.